॥ प्रज्वालितो ज्ञानमय: प्रदीप: ॥

SRJIS

शिक्षण प्रसारक संस्थेचे

## शिक्षणशास्त्र महाविद्यालय संगमनेर, जिल्हा - अहमदनगर

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ गुणवत्ता सुधार कार्यक्रमा अंतर्गत संयुक्त विद्यमाने

आयोजित

SPPU

Special Issue of an International

**SCHOLARLY RESEARCH JOURNAL FOR INTERDISCIPLINARY STUDIES**

Impact factor SJIF 2016-6.177, ISSN 2278-8808




राज्यस्तरीय चर्चासत्र

# गुणवत्तापुर्ण शिक्षणासाठी गुणांकन दर्जा आणि अधिस्विकृती : गरज आणि आव्हाने

# Ranking & Accreditation For Quality Education : Need & Challenges

मंगळवार दि ३० जानेवारी २०१८



मुख्य संपादक

डॉ भालचंद्र बाळकृष्ण भावे

सहसंपादक

प्रा. कविता किसनराव काटे

सहसंपादक

प्रा. राजू गुलाव शेख

सदस्य संपादक मंडळ

प्रा. मंगल राधाकृष्ण आरोटे

प्रा. नयना भास्करराव पंजे

प्रा. संजय म्हाळस खेमनर

सौ. वर्षा नरेंद्र आडेप

| | | | |
|---|---|---|---|
| 21 | प्रा. शिंदे प्रकाश जीवन | गुणात्मक शिक्षणासाठी अभ्यासक्रम विकास | 65-68 |
| 22 | डॉ सोनवणे वासुदेव महादेवराव | माध्यमिक शाळांची अधिस्वीकृती काळाची गरज | 69-71 |
| 23 | प्रा जनार्दन भाऊ वाघडे | शिक्षक शिक्षणातील गुणवत्तावाढीसाठी महाविद्यालयातील आव्हाने | 72-73 |
| 24 | अर्चना दिनकर नेमाडे | उच्च शिक्षणातील गुणवत्ता : काळाची गरज | 74-76 |
| 25 | प्रा. विष्णू बाळशीराम अडसरे | गुणवत्तापुर्ण शिक्षणासाठी सहकार्ययुक्त अध्ययन कार्यनिती | 77-81 |
| 26 | प्रा. अडसरे योगिता विष्णू | गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी नविन अध्यापनपूर्ण प्रवाह | 82-86 |
| 27 | प्रा. अलोट मंगल राधाकृष्ण | गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी शाळासिध्दी कार्यक्रम एक साधन | 87-89 |
| 28 | प्रा. राजु गुलाब शेख | अधिस्विकृतीय मूल्यमापनातील बदलते प्रवाह | 90-93 |
| 29 | प्रा. नयना भास्करराव पंजे | अधिस्विकृती आणि अध्ययन अध्यापन गुणवत्ताविकसन | 94-96 |
| 30 | प्रा.कविता किसनराव कांटे | गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठीची अधिस्वीकृती व शिक्षणतील नवीन प्रवाहाचा वापर | 97-102 |
| 31 | प्रा.खेमनर संजय म्हाळू | अध्ययन अध्यापनातील गुणवत्तावाढीसाठी अध्यासपूरक कार्यक्रमाची उपयुक्तता | 103-107 |
| 32 | प्रा. पांढरे विलास देवराव | गुणवत्तापूर्ण शिक्षणवृध्दिसाठी भविष्याभ्यास शिक्षणाची उपयुक्तता | 108-112 |
| 33 | अर्चना संजय खेमनर | अध्ययन अध्यापनातील गुणवत्तावृध्दिसाठी क्रमान्वित अध्ययनाची उपयुक्तता | 113-116 |
| 34 | प्रा.गवांदे जगन विठ्ठल | क्रीडा शिक्षणातून गुणवत्ता विकास | 117-119 |
| 35 | सापनर चद्रकला बळीराम | शिक्षणातील नविन विचार प्रवाह व गणवत्ता वाढीसमोरील आव्हाने . | 120-121 |
| 36 | प्रा.भोकनळ के .पी. | अध्ययन अध्यापनातील गुणवत्ता व व्यवस्थापन | 122-123 |
| 37 | प्रा.गागरे एस.पी. | ग्रंथालयाचे महाविद्यालयीन शिक्षणातील स्थान | 124-125 |


Scanned with OKEN Scanner

# 'गुणवत्तापुर्ण शिक्षणासाठी सहकार्ययुक्त अध्ययन कार्यनिती'

प्रा. विष्णू बाळशीराम अडसरे
*आण्णासाहेब आवटे कॉलेज, मंचर.*

**प्रस्तावना :**

माहिती आणि संप्रेषण तंत्रज्ञानाचा उद्देश केवळ माहिती संक्रमित करणे नसून व्यक्तीस ज्ञानसमृध्द बनविणे आहे. त्याचबरोबर समाजाला अध्ययनशील करुन राष्ट्राचा विकास घडवून आणणे आहे. व्यक्ती आणि समाज यांच्या अध्ययनासाठी सहयोगी संज्ञा वापरली आहे. सहकारी अध्ययनास मिळतीजुळती ही संज्ञा असून मोठया प्रमाणात सहकार्य अध्ययनात अपेक्षित आहे. म्हणजेच समाजाशी अध्ययनासाठी आंतरक्रिया घडवून आणणे आणि विकास साधणे होय सहकारी अध्ययनात लहान गटाचा विचार होतो. येथे अध्ययनात समुदाय, समाज व राष्ट्र विचारात घेऊन त्यांना अध्ययनशील बनविणे किंवा अध्ययनशील समाज विकसित करणे हा हेतू आहे. सहयोगी अध्ययनात विविध विद्याशाखांचे विद्यार्थी, विविध विद्याशाखा एकत्रित येतात, चर्चा करतात, विचार, माहिती यांची देवाणघेवाण करतात आणि विशिष्ट ध्येय गाठतात किंवा समस्यांचे निर्मूलन करतात. सहयोगी अध्ययनात विविध भौगोलिक परिस्थितीत राहणारे विद्यार्थी, विद्याशाखा एकत्रित येऊ शकतात यासाठी इलेक्ट्रिक साधनांना प्राधान्य दिले जाते.

**सहकारी किंवा सहकार्ययुक्त अध्ययन :--**

शिक्षण हे समाजपरिवर्तनाचे प्रभावी माध्यम आहे. शाळा ही समाजाची लघुप्रतिकृती मानली जाते. शाळेच्या माध्यमातूनच व्यक्तींमध्ये सहकार्याची भावना, आपुलकी, संघप्रवृत्ती व गटकार्य इत्यादींचे महत्त्व पटवून दिले जाते. यासाठी अभ्यासक्रमामध्ये विविध अभ्यासपूरक व अवांतर उपक्रम यांचे नियोजन केलेले आहे. याला प्रत्यक्षात अमलात आणण्याचे काम शिक्षक करीत असतो. विद्यार्थ्यांना गटकार्य, गटचर्चा, गट स्वाध्याय देऊन तो सतत प्रयत्नशील असतो. मात्र वेळेअभावी किंवा काही कारणास्तव अध्यापनात याचा फारसा उपयोग होत नाही. या मर्यादेवर मात करुन विद्यार्थ्यांमध्ये सहकार्याची भावना निर्माण करण्यासाठी व अध्यापन मनोरंजक व अधिक प्रभावी करण्यासाठी विविध पध्दती तसेच तंत्राचा वापर केला जातो. त्यातीलच एक महत्त्वाची पध्दती म्हणजे ' सहकार्ययुक्त अध्ययन ' हा एक नवीन विचार विकसित झाला आहे. सहकार्ययुक्त अध्ययनाने विद्यार्थ्यांमध्ये सहकार्य वृत्ती व मूल्ये विकसित करता येतात. दैनंदिन जीवनात याचा उपयोग निश्चितच होतो.

**सहकार्ययुक्त अध्ययन : अर्थ व स्वरुप ( Meaning and nature)**

सहकार्य म्हणजे एकमेकांना साहाय्य करणे. सहकार्ययुक्त अध्ययन म्हणजे एकमेकांच्या सहकार्यातून अध्ययन घडून येणे. हे सहकार्य शिक्षकांचे विद्यार्थ्यांशी, विद्यार्थ्यांचे विद्यार्थ्यांशी, एका गटातील विद्यार्थ्यांचे दुसऱ्या गटातील विद्यार्थ्यांशी. ' एकमेकां साहाय्य करु, अवघे धरु सुपंथ. ' या उक्तीप्रमाणे या पध्दतीमध्ये विद्यार्थ्यांच्या सहकार्यातून अध्ययन घडून येते. एखादा हेतू साध्य करण्यासाठी एकत्रित येऊन कार्य करणे म्हणजे सहकार्ययुक्त अध्ययन होय . या अध्ययनामध्ये व्यक्ती स्वत:ला व गटाला फायदेशीर ठरेल असे कार्य करण्याचा प्रयत्न करते. या अध्ययनात विद्यार्थ्यांचे लहान-लहान गट तयार केले जातात. गटातील प्रत्येक सदस्यास नेमून दिलेले कार्य समजून घेऊन पूर्ण करावयाचे असते. त्यासाठी गटातील विद्यार्थ्यांना सखोलतेने अध्ययन करण्यास प्रेरित केले जाते.

" सहकार्ययुक्त अध्ययन ही अशी प्रक्रिया आहे की, ज्यामध्ये विद्यार्थी गटामध्ये एकत्र येऊन शिक्षकांनी प्रारंभी सादर केलेल्या साहित्यावर कार्य करतात."

वरील व्याख्यांवरुन असे लक्षात येते की, विद्यार्थ्यांना गटाद्वारे अध्ययनात गुंतवणूक ठेवले जाते. उद्दिष्ट गाठण्यासाठी विद्यार्थी गटामध्ये एकमेकांच्या सहकार्याने कार्य करीत असतात. गटाचे यश हे प्रत्येक विद्यार्थ्यांच्या यशावर



Scanned with OKEN Scanner